# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/03/2023 (गुरूवार) दुपार

---

## जबरी संभोग

पो.स्टे. जलालखेडा :— दिनांक १९/१२/२०२१ चे १२:०० ते १७/०३/२०२३ चे ११.०० वा. दरम्यान फिर्यादी/पिडीता वय १७ वर्ष ०५ महिने हीचे आई—वडील मरण पावले असुन ती १२ वीला शिकत आहे. यातील आरोपी नामे— मंगेश दिलीप पेरोडीये, वय २२ वर्ष, रा. मायवाडी ता. नरखेड जि. नागपुर याने फीर्यादीस तुझे घरचे लोंकांनी तुला शिकविले नाही तर, मी शिकविन, तुला जॉब लावुन देईल, तुझे आई, वडीलांचे नाव उंच करीन असे म्हणुन फिर्यादीशी त्याने जवळीक केली. त्यांनंतर त्याने फिर्यादीला माहे ४/२२ मध्ये सोमेश्वर कील्ला देवस्थान जलालखेडा येथे भेटायला बोलाविले तेव्हा फिर्यादीला तो ''तुला मी शिकवीन'' असे म्हणुन लग्न करण्याची लालच देत होता त्यानंतर माहे ८/२२ मध्ये त्याने मोटार सायकलवर बसवुन काटोल मार्गे कांरजा रोडने जंगलात घेवुन गेला व तेथे त्याने फिर्यादीला ''मी तुझे सोबत लग्न करीन'' असे म्हणुन शारीरीक संबध केले. तेव्हा त्याने त्याचे मोंबाईल मध्ये फोटो देखील काढल्या. त्यांनतर वरील फोटो व्हायरल करीन अशी धमकी देवुन पुन्हा वरील जंगलात तसेच विविध ठिकाणी फिर्यादीला मोटार सायकलने नेवुन त्याने वारंवार शारीरीक संबध प्रस्थापित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७६ (२) (एन), ५०६ भा.द.वी सहकलम ५ (L), ६ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि. शेंडे पो.स्टे. जलालखेडा ९६३७५७८७६३ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. रामटेक:— दिनांक २१/०३/२०२३ चे १९.२० वा. चे सुमारास पो.स्टे. रामटेक हद्दीत फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी ही दिनांक २१/०३/२०२३ ला १२ वी चा पेपर देण्याकरीता रामटेक ला गेली होती पेपरचा वेळ ०३/०० ते ०६/०० असल्यामुळे मुलगी ०७/०० पर्यतं घरी न आल्यामुळे तिच्या वर्गात शिकणारी मुलगी तिची मैत्रिण हिला विचारले असता मी एकटीच घरी आली. मला ती दिसली नाही असे सांगीतले फिर्यादीने आज पावेतो तिचा आजुबाजुचे गावाला व नातेवाईकांकडे शोध घेतला असता मिळुन आलेली नाही. तिला कोणीतरी अज्ञात ईसमाने फुस लावुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनी निशा भुते मॅडम पो स्टे रामटेक मो क्र ९८२२५६६१८० या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर